MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue February 2019
Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

Special Issue – Vol. II



## VIMUKTA - NOMADIC CASTES – TRIBES & OTHER BACKSWORD CLASS: PRESENT CONDITIONS, DEVELOPMENT & CHALLENGES.

Guest Editor
Dr.B.K.Shep
Dr.R.D.Rathod
Dr.K.M.Bhange

56) हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव फुलसिंग नाईक ; जीवन आणि कार्य ||141
डॉ.शिवाजी सोमला पवार, भोकर जि.नांदेड

57) महाराष्ट्रातील विमुक्त—भटक्या जाती—जमाती इतर मागासवर्गीय स्त्रियांची स्थिती ||143
सविता साहेबराव काळबांड, औरंगाबाद

58) डोंबारी समुदाय कासमाजशास्त्र ||145
व्यंकट बा.धारासुरे, हैदराबाद

59) पुरोगामी महाराष्ट्राचे जाणते नेतृत्व- श्री वसंतराव नाईक कृषी, शिक्षण व विविध सुधारणात्मक योजना व कार्याचा ... ||147
प्रा. सोनवळकर रमेश शंकरराव, अंबाजोगाई

60) विमुक्त - भटक्या जाती- जमाती व त्यांची अस्थिर जीवनपद्धती : एक ऐतिहासिक आढावा ||150
प्रा.डॉ.सुर्यवंशी एन.बी., शिरुर अनंतपाळ जि.लातूर

61) समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून भटक्या विमुक्त्यांच्या आत्मकथनातील स्त्री : एक शोध ||152
प्रा. डॉ. गायत्री गाडेकर, अंबाजोगाई जि. बीड

62) महाराष्ट्रातील पारधी समाजाची स्थिती आणि त्यांच्या समस्या ||156
मिनाक्षी पुनमचंद कुरिल, औरंगाबाद

63) बीड जिल्हयातील बंजारा जातीची सद्यास्थिती व आव्हाण -एण्समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ गेवराई तालुका ) ||159
डॉ. तंगलवाड डी.एम., गढी,ता.गेवराई,जि.बीड

64) महाराष्ट्रातील विमुक्त—भटक्या जाती— जमाती व इतर मागासवर्गीय विकासात लोकनेते गोपीनाथ मुंडे... ||161
प्रा.जिजाराम रेशिमराव कावळे, अंबाजोगाई

65) पुरोगामी महाराष्ट्राच्या निर्मीतीत वसंतराव नाईक यांचे योगदान ||163
प्रा.राठोड नामदेव मंचा, सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड

66) वसंतराव नाईकांचे शेतीविषयक योगदान ||164
प्रा. डॉ. वागडव ए. आर. & दांडेगावकर गजानन सुखाजी, औरंगाबाद

67) वसंतराव नाईक यांचे सामाजीक कार्य ||166
प्रा. परळकर शशिकांत दतोपंत, सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड

68) महाराष्ट्राच्या समृद्धीचा ध्यास घेणारे वसंतराव नाईक ||167
डॉ. सविता मुंडे, जालना

69) महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमाती ||169
डॉ. भालेराव जी. पी., सेनगांव ता. सेनगांव जि. हिंगोली

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

56

# हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव फुलसिंग नाईक ; जीवन आणि कार्य

**डॉ.शिवाजी सोमला पवार**
संशोधन-मार्गदर्शक, इतिहास विभाग
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,भोकर जि.नांदेड

***********

**प्रस्तावना :**

वसंतराव नाईक यांनी बहुजन समाजाच्या हितासाठी बहुजन समाजाशी समरस होऊन कार्य करण्यामध्ये आपले उभे आयुष्य घातले आहे. हे मी अनेक वर्ष त्यांच्या घराण्यापासून पहात आहे. मागासलेला समाज शिक्षणा शिवाय उन्नत होणे शयक्य नाही. हे त्यांचे वडील अत्यंत वृद्धापकाली सुद्ध माझ या जवळ डोळयांत पाणी आणून सांगतांना मी पाहिले आहे. गरीब मजुरापासून ते सुशिक्षित माणसापर्यंत मित्रत्वाच्या नात्यांनी वागतांना मी अनेकदा त्यांना पाहिले आहे.

आपल्या मुख्यमंत्री पदावरुन वागतांना त्यांच्या स्वभावात थोडाही फरक झालेला मला आढळलेलानाही. त्यांचे चिंतन देशाच्या नवनिर्मितीकडे व लक्ष मजदूर व गरीव शेतकरी उन्नत होतील ह्याकडेच असते. ही विदर्भाची मायभूमी अशा अनेक रत्नांना प्रसवली आहे. त्याच इतिहासाची साक्ष पटविण्यासाठी स्वर्गीय श्री कन्नमवारांनंतर त्यांनीही लोकजनमनावर आपला वारसा उत्तम तऱ्हेने चालविला आहे. त्याही पुढे या विशाल महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी त्यांचे जीवन देशव्यापी होवो अशी त्यांच्या गौरव पत्रिकेला माझी शुभकामना आहे[१].-तुकडयादास (दिऩांक १३/१०/१९६६)

वसंतराव नाईक यांच्या व्यक्तिमत्वाचे व त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या प्रदीर्घ कारकीर्दीचे मूल्यमापन करतांना प्रथमतः पहिली महत्वाची बाब म्हणजे वसंतराव नाईक हे प्रतिष्ठित व प्रस्थापित अशा मराठी समाजाला अगदी अपरिचित असलेल्या वंजारा समजा घटकातून वर आलेले व्यक्तिमत्व होते.महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर मा.मारोतराव कन्नमवार हे जरी जवळपास वर्षभर पदावर असले तरी यशवंतराव चव्हाणानंतर अकरा वर्ष राज्याचा कारभार वसंतराव नाईक यांनी यशस्वी पार पाडली. महाराष्ट्र राज्याचे तिसरे मुख्यमंत्री व एक कृषितज्ञ होते. विद्यार्थीदशेत त्यांच्यावर महात्मा जोतिबा फुले व डेल कार्नेगी या दोघांच्या विचारांची छाप पडली[२].कष्टातून वर आलेल्या समाजातील तरुणांमध्ये दिसणारे त्यांचे ताठपण नंतरच्या सुखासीन आयुष्यातही तसेच होते. वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राचा धूरा सांभाळला तेंव्हा ते तुटीचे राज्य होते.अन्नधान्याच्या संकटात होते आणि दुष्काळांच्या सावटात होते. मुंबईत असतोष आणि कामगारांत चळवळ होती.विदर्भात असमाधान आणि मराठवाडयात विकासाच्या अनुशेषावरुन उठलेले वादळ होते. पश्चिम महाराष्ट्राला हा मुख्यमंत्री आपल्यावर लादलेला वादळा तर कोकण प्रदेशाला त्याचे दुरचे असणे खटकणारे होते.२० फेब्रूवारी १९७५ ला मुख्यमंत्रीपद सोडले तेंव्हा महाराष्ट्राची तूट भरुन निघाली होती, अन्नधान्यात स्वंयपूर्णता, मुंबईतला असंतोष, विदर्भातले असमाधान, मराठवाडयाच्या अनुशेषवर मात करण्यात यश आले होते. आणि कोकणचा त्यांच्याविषयीचा दुरावा मिटला होता. त्या गणिताने वसंतराव नाईकचे यश पूर्ण नसले तरी मोठे अभिनंदनीय होते.आणि त्यात त्यांना व महाराष्ट्राला समाधान होते. सन्मानपूर्वक स्वीकारलेले मुख्यमंत्रीपद त्यांनी जनतेतला आपला आदर कायम राखूनच नंतरच्या नेत्याकडे सोपविलेले साऱ्यांना दिसले[३].

**जीवन :-**महाराष्ट्र राज्याचे तिसरे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील, पुसद तालुक्यातील,गहुली या छोटयाश्या खेडयात, बंजारा समाजातील एका सधन शेतकरी कुटुंबात झाला. नाईकचे मुळ आडनाव राठोड असून त्यांचे आजोबा चतुरसिंग राठोड यांने गहूली हे खेडेगाव वसविले. त्याने जमीन जुमला गोळा करुन भटक्या व विमुक्त समाजाला स्थिर जीवन प्राप्त करुन दिले. बंजारा समाजाच्या पुढारी म्हणजेच नाईक होता. यावरुनच पुढे नाईक हे आडनाव रुढ झाले.चतुरसिंगाचा मुलगा फुलसिंग हा समाजाचा नाईक झाला. फुलसिंग नाईकला दोन मुले त्यात मोठा मुलगा बाबासाहेब नाईक तर छोटा मुलगा वसंतराव नाईक त्यांना छोटे बावा या नावाने प्रसिद्ध होते[४].पुढे त्याने विठोली व अमरावती येथे शिक्षण घेऊन १९३३ मध्ये नागपूर येथील नील सिटी हायस्कूलमधून मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले.१९३७ मध्ये मॉरिस कॉलेज, (संध्याचे वसंतराव नाईक सामाजिक विज्ञान संस्था) नागपूर येवून बी.ए.परीक्षा उत्तीर्ण , १९४० मध्ये नागपूर विद्यापीठ विधी महाविद्यालयातून एल.एल.बी.पदवी उत्तीर्ण झाले.

विद्यार्थीदशेत त्यांच्यावर महात्मा जोतिबा फुले व डेल कार्नेगी या दोघांच्या विचारांची छाप पडली. त्यामुळे महाविद्यालयात शिकत असतांना त्यांना स्नेह नागपूरमधील घाटे या प्रसिद्ध ब्राम्हाण कुटुंबीयांशी जडला. या स्नेहाची परिणती वसंतराव व वत्सलाबाई यांच्या आंतरजातीय प्रेम विवाहात झाला;(६ जुलै १९४१), या विवाहामुळे विदर्भातील बंजारा समाजात खळबळ उडाली त्यामुळे उभयतांना काही वर्षे आपापल्या घरांपासून अलिप्त राहणे अपरिहार्य झाले. पण वसंतरावांनी पूर्ण विचारान्ती हे लग्न केले होते. त्याचा वकिली व्यवसाय चांगला चालला होता. वत्सलाबाई नाईक बी.ए. असून पतीच्या बरोबरीने समाजकार्यात सहभागी झाल्या. त्यांना दोन मुले निरंजन व अविनाश असून दोघेही सुविद्यभूषित आहेत[५].वसंतराव नाईक यांनी कायद्याची पदवी घेऊन १९४१ मध्ये सुरुवातील अमरावतीचे प्रख्यात वकील कै.बॅ.पंजाबराव देशमुख ह्यांच्याबरोबर व नंतर पुसद येथे स्वतंत्र्यपणे वकिली व्यवसायास प्रारंभ केला.याच काळात पुसद तालुक्यातील आदर्श ग्राम चळवळीत पुढकार घेतला. त्यांच्या प्रयत्नामुळे व तळमळीमुळे त्यांचे स्वतःचे गाव गहुली हे आदर्श गाव बनले. भटक्या व विमुक्त समजाता जन्मलेल्या आणि नागपूरातील घाटे या प्रतिष्ठित ब्राम्हण कुटुंबातील आलेल्या वत्सलाबाईशी प्रेमविवाह केलेल्या वसंतरावांच्या मनाला जातीयताही कधी शिवली नाही.

वसंतराव नाईक यांनी आदिवासी तरुणांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या पाठीवर हात ठेवला ग्रामीण समाज जीवनाची नाडी त्यांना माहित होती. ते सामान्य लोकांची भाषा बोलायचे. कुळकायदा, कसेल त्यांची जमीन, आदिवासींच्या नावाने शेत जमीन असे कितीतरी समाजहिताचे निर्णय त्यांनी घेतले[६].

**वसंतराव नाईक यांचे सामाजिक कामगिरी**

वसंतराव नाईक महाविद्यालयीन शिक्षण घेत असत्या त्यांच्यावर

महात्मा जोतिबा फुले, डेल कार्नेगी, राजर्षी शाहूमहाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,डॉ.पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, तुकडोजी महाराज, थोर समाजसेवक बाबा आमटे, यशवंतराव चव्हाण, पंतप्रधान लालबहादू शास्त्री,पंतप्रधान इंदिरागांधी या मंडळीचे विचारांची छाप होती. वसंतरावांच जीवन समाजसुधारक, वकील व राजकीय पुढारी अशा क्रमाने विकसीत झाले. एल.एल.बी.होऊन वसंतरावानी पुसद येथे वकिलीच्या व्यवसायात सुरुवात केली. फक्त वकिली करणे हा काही वसंतरावांचा एकमेव उद्योग नव्हता. तर वकिलीपेक्षाही ते शेतीत जास्त लक्ष घालीत असत. सामाजि कामे करण्याचा त्यांनी नित्य नियमच केला होता. पुसदजवळील खेडयात जाऊन साक्षरताप्रसार, दारुबंदी, ग्रामसुधारणा व जुन्या चालीरिती मोडून काढण्याची मोहिम त्यांनी सुरु केली होती. वसंतरावाना राजकारणापेक्षा सामाजिक सुधारणेचे कार्य करण्यात अधिक रस होता. त्यांच्या जीवनात सुरुवातीपासूनच एकाकीपणाला थारा नव्हता. रोजचे जेवण ते एकटे कधीच घेत नसत. त्यांच्यासोबत पंक्तीला चार-सहा लोक असायचे एखादया दिवशी पंक्तीला जर कोणी नसेल तर त्यांना जेवण जात नसे. आदरातिथ्य हा वसंतरावांच्या जीवनाचा स्थायीभाव आदरातिथ्या बरोबरच इतरांना मदत करण्याची वृत्तीही त्यांच्याजवळ सुरुवातीपासूनच आहे. कुणाचे काही अडले तर त्याला मदत करण्यात वसंतराव नाईक कधीही मागेपुढे पाहत नसत[७].

महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने दिशा दिली ती वसंतराव नाईकांनी ! साठच्या दशकात महाराष्ट्रात म्हणावे तसे उद्योग भरभराटिला आले नव्हते. उत्तरप्रदेश हे उद्योगधंद्याचे केंद्रबिंदू होते. राज्यात उद्योगधंदे तर वाढले पाहिजेच, परंतू शेतकरी आणि शेती टिकली पाहिजे, या मताचे होते.बहुसंख्य समाज हा शेतीवर अवलंबून असतो. त्या शेतकऱ्यांना कृषिक्षेत्रात बदल घडवून त्यांना मदतीचा हात दिला. वसंतराव नाईक हे रसिक होते. त्यांच्या स्वभावात मैफलीपणा होते. हसरे संवाद मनमुरादपणे अनुभवणे हा त्यांच्या विरंगुळयाचा भाग, चांगली माणसे, कलावंत, मूर्तिकार, चित्रकार आणि साहित्यिक यांच्या संपर्काची त्यांना ओढ होती. त्यांना ते सतत प्रोत्साहन देत आणि त्या कौतुकात साधे कोरडेपण नसे, तर त्याला मदतीची जोड देत असे. औष्णिक विद्युत प्रकल्पांप्रमाणेच महाराष्ट्रातील मोठी धरणे वसंतराव नाईकसाहेबांच्याच कारकिर्दीत झाली आहेत. यामध्ये महाकाय उजनी, जायकवाडी, अप्पर वर्धा, पेंच , चास, अरुणावती, कालीसरार, धोम यांच्यासह ७० धरणांचा समावेश आहे. म्हणजेच अन्नधान्य उत्पादन आणि वीज अशा महत्वाच्या आघाडयावर नाईकसाहेबांच्या काळात फार मोठे काम झाले . महाराष्ट्राच्या विकासाच्या बांधणीत नाईकसाहेबांना तोड नाही[८].

**निष्कर्ष :**

वसंतराव नाईक यांना हरितक्रांतीचे जनक, राजकारणातील राजहंस, महाराष्ट्रांचा भाग्यविधाता,हरितक्रांतीचा प्राणवायु, देवमाणूस, सज्जन माणूस, कृषी विद्यापीठांचा शिल्पकार, नायक नव्हे महानायक, तडफदार मुख्यमंत्री, दिलखुलास मुख्यमंत्री अशा अनेक पदव्यांनी महाराष्ट्रांच्या जनतेने भूषवले आहे. पण, माझ्या मतं खऱ्या अर्थाने काका म्हणजे स्वत:च्या शेतात प्रचंड आर्थिक झीज सोसून नवनवे प्रयोग करणारे प्रगतिशील शेतकरी होते. ग्रामीण भागातील बंजारा समाजात जन्मलेले वसंतरावजी स्वकर्तृत्वाने राजकारण आणि समाजकारण यात तळपू लागले. बुद्धिमता, संघटन कौशल्य, दूरदृष्टी, अखंड परिश्रम, सर्वसामान्य , उपेक्षित व शेतकऱ्याबद्दलची कळकळ हे त्याचे गुण त्यांना झपाटयाने यशोशिखरावर घेऊन गेले.वसंतरावांचे राजकारण केंद्री होते, विरोधकांचा ते सन्मान करत ते उत्तम प्रशासक होते. बदलत्या काळाचे त्यांचे भान उच्चकोटीचे होते. ग्रामीण भागाकडे त्यांनी जसे लक्ष दिले तसेच नागरी भागांकडेही लक्ष दिले. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचा पाया राज्याच्या सर्व भागांत त्यांच्याच काळात विस्तारला. राज्य अन्नधान्याचा बाबतीत समृद्ध करण्याचा विडा त्यांनी उचलला, त्याच्या कार्यकाळात चार कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली हे देशातील एकमेव उदाहरण असावे, कृषी विद्यापीठांमध्ये शेतीपूरक नव्या वाणांच्या संशोधनाला चालना.तंत्रज्ञानाचा विकास या बाबींकडे त्यांनी व्यक्तिगत लक्ष पुरवले. वसंतराव नाईक यांच्या कार्यकाळात समर्थ, एकसंध, सामाजिकदृष्टया पुरोगामी, औद्योगिकदृष्टया प्रगत आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न महाराष्ट्राची उभारणी झाली. इ.स.१९६५ पासून १९७२-७३ पर्यंत केंद्र सरकारकडून मदत प्राप्त करुन घेतली. या काळावधंत राज्यात पाचवेळा दुष्काळ आठ वर्षात पडले. चाराटंचाई लक्षात घेवून गुरांच्या छावण्याही सुरु करण्यात आले. देशात दुष्काळी कामावर जेवढया लोकांना काम देण्यात आले त्यातील निम्म्या लोकांना एकटया महाराष्ट्राने काम दिले होते. नोव्हेंबर १९७२ मध्ये १६ ते १८ लाख लोकांना काम देण्यात आले. ग्रामीण परिवर्तनाची रोजगार हमी योजना १ ते १९७२ पासून प्रत्यक्षपणे हाती घेण्यात येईल असे जाहीर केले परंतु १९७८ पासून रोजगार हमी कायद्याची अमलबजावणी सुरु झाली. मार्च १९६९ मध्ये राजपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत सुशिशिक्षांची बेकारी, नोकऱ्यात ८० टक्के जागा, स्थानिक लोकांना,श्रमाची प्रतिक्षा, शेतमालास किफायतशीर भाव, शेतमजूरीचे दर भाववाढीस आळा, ग्राहक सहकारी भांडार, लॉटरी वगैरे विषय उपस्थित करुन सदस्यानी त्यावर मुख्यमंत्रांनी सरकारी धोरण स्पष्ट करावे अशी अपेक्षा केली. २५ मार्च १९६९ रोजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी विधानपरिषदेत अभिभाषणावरील चर्चेस दिलेले उत्तर अशा विविध विषयांचा सांगोपाग परामर्श घेणारे होते. महाराष्ट्राच्या इतिहासात एकदा नव्हे तर तीनदा ,(१९६३,१९६७,१९७२) मुख्यमंत्रीपदाची विनविरोध निवड होण्याचे भाग्य वसंतरावांच्या वाटयाला आले. ५ डिसेंबर १९६३ ते १९ फेब्रुवारी १९७५ पर्यंत पदावर होते.१८ जुलै १९७९ रोजी सिंगापूर येथे वयाच्या ६६ व्या वर्षी या महानायकाने जगाचा निरोप घेतला.

**संदर्भसूची :**

१) प्रमोद त्र्यं.नलावडे (मु.संपादक), लोकराज्य, हरित क्रांतीचे प्रणेते, वसंतराव नाईक, जन्मशताब्दी, डिसेंबर २०१२, मुख्यपृष्ठ.

२) लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी, मुंबई, Published on July२,२०१३.

३) संपादक-महाराष्ट्र विधानमंडळ, चतुरस, वसंतराव नाईक-हरित क्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधान भवन, मुंबई, जुलै २०१३, पृष्ठ-९.

४) लोकराज्य, जीवनयात्रा, पृष्ठ, ३८.

५) https://www.loksatta.com >vasantrao.

६) Mr.Vikaspedia.in.

७) पूर्वोक्त, लोकराज्य, पृष्ठ १२.

८) पूर्वोक्त, लोकराज्य, पृष्ठ १९.

९) पूर्वोक्त, लोकराज्य, पृष्ठ ५५.